


## महाराष्ट्र शासन

## अर्थसंकल्पः २०१६-१७

# सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

**समर्थन**


**अर्थसंकल्प अध्ययन केंद्र**

११५- समर्थन, धुरी कॉमर्स प्लाझा, वसई स्थानकासमोर,
वसई (पू), पालघर -४०१ २०८ ✆ ०२५०-२३९०१०३/१०४
Email: samarthanmumbai97@gmail.com website: www.samarthanadvocacy.org

**समर्थन**

संस्थापक अध्यक्ष : **स्व. सदानंद वर्दे**

संस्थापक : **श्री. विवेक पंडित**

अध्यक्ष : **श्री. प्रविण महाजन**

उपाध्यक्ष: **श्री. आशिष कुलकर्णी**

कार्याध्यक्ष: **श्री. संतोष पाटील**

सचिव : **श्री. सुशील शुक्ल**

संपादन :
**मुक्ता भारती**

संकलन:
**रुपेश कीर** -९८९२९३९६१७
**मॅकेन्झी डाबरे** - ९२७१७१४२८४

मांडणी व अक्षरजुळणी :
**प्रतिक्षा कोयंडे**
**सोनल सहस्त्रबुद्धे**

**नोंदणी क्रमांक:**
पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.एफ -१८९०३, मुंबई
सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई
१५६७/९६ जीबीबीएसडी

**प्रकाशक (पत्रव्यवहार):**
समर्थन – ११५- धुरी कॉमर्स प्लाझा, वसई रोड
रेल्वे स्थानकासमोर,
वसई (पू), जि. पालघर -४०१ २०८
दूरध्वनी: ०२५०-२३९०१०३/४
Email:samarthanmumbai97@gmail.com
website: www.samarthanadvocacy.org

# लोकशाही बळकट करण्याकरिता उपेक्षितांचे ‘समर्थन’

## समर्थन विषयी थोडेसे

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे ‘समर्थन’. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

## ‘समर्थन’च्या कामाचे विविध स्तर

- ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.
- प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.
- प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.
- विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.
- राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.
- आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.
- ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.
- लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.
- अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

# पुस्तिका वाचण्यापूर्वी थोडेसे. . .

- 'समर्थन'ची प्रकाशने सत्तेतील तसेच विरोधातील सन्माननीय सदस्यांना उपयुक्त व्हावीत यासाठी असतात.
- सदर माहिती पुस्तिकेचा उद्देश विधिमंडळ सभागृहांमध्ये राज्याच्या अर्थसंकल्पावर होणाऱ्या चर्चेत राज्याच्या अर्थसंकल्पातील माहिती सुलभपणे वाचता यावी आणि त्यामुळे विधिमंडळात दर्जेदार चर्चा व्हावी हा आहे.
- अर्थसंकल्प हा राज्याच्या धोरणाचा खराखुरा चेहरा असतो, प्राधान्यक्रमाचा आरसा असतो त्यामुळे अर्थसंकल्पातील तरतुदी राज्यातील दीन-दुर्बल घटकांच्या जीवनावर काय प्रभाव टाकतात यावर सभागृहात चर्चा व्हावी अशी अपेक्षा असते.
- माध्यमे जनमतावर प्रभाव टाकतात त्यामुळे धोरणकर्त्यांना त्याची दखल घ्यावी लागते. ही पुस्तिका माध्यम प्रतिनिधींनाही संदर्भ पुस्तिका ठरावी असा प्रयत्न आहे.
- सदरची माहिती अर्थसंकल्पीय प्रकाशने, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या वित्तीय अहवाल, विनियोजन लेखे, शासनाच्या विविध विभागांनी, महामंडळांनी प्रकाशित केलेले अहवाल याच माहितीवर आधारित आहे. त्यात शासना व्यतिरिक्त अन्य संस्थांची मते अगर माहिती यांचा आधार घेतलेला नाही. त्यामुळे प्रत्येक माहितीखाली त्या माहितीचा स्त्रोत दिला आहे.
- तुलनात्मक अभ्यास करता यावा म्हणून २००८-०९ पासून २०१६-१७ पर्यंत अर्थसंकल्पातील प्रत्यक्ष खर्च आणि तरतूद समाविष्ट केली आहे.
- माहिती काटेकोरपणे तपासण्यात आली आहे. तरीही काही त्रुटी राहिल्यास त्या निदर्शनास आणल्यास ऋणी राहू.
- प्रकाशन अधिक माहिती पूर्ण सुलभ आणि प्रभावी व्हावे म्हणून आपल्या सूचनांचे स्वागत आहे.
- अर्थसंकल्पविषयक अधिक माहिती जाणून घेण्याची कुणाची इच्छा असल्यास या विषयातील अनुभवी पत्रकार, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, विषयतज्ज्ञ तसेच निवृत्त सनदी अधिकारी यांचेमार्फत प्रत्यक्ष चर्चा घडवून आणण्याची जबाबदारी समर्थन स्वीकारीत आहे.

- विवेक पंडित
संस्थापक, समर्थन
९८२३१४७००३
pvivek2308@gmail.com

# सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

## ठळक वैशिष्ट्ये :

☞ सन २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीची लोकसंख्या १ कोटी ३२ लाख ७५ हजार ८९८ इतकी आहे व अनुसूचित जमातीची लोकसंख्या १ कोटी ५ लाख १० हजार २१३ इतकी आहे.

☞ सन २०१४ मध्ये राज्यात एकूण १७६८ गुन्हे दाखल झाले असून सन २०१३मध्ये दाखल गुन्हे १६७८एवढे आहे. सन २०१४ मध्ये गुन्ह्याच्या प्रमाणात ५.४ टक्के इतकी वाढ झाली आहे. सन २००९ च्या तुलनेत २०१४ मध्ये ६१.३१टक्के इतकी मोठी वाढ झालेली आहे. सन २०१३च्या तुलनेत (३१०) सन २०१४ मध्ये (५३२) हिंसामय गुन्ह्यांत ७१.६१टक्के वाढ झाली आहे.

☞ भारताचा मानव विकास अहवाल २०११ नुसार देशाचा मानव विकास निर्देशांक ०.४६७ आहे तर राज्यासाठी तो. ०.५७२ आहे.

☞ राज्यात माता मृत्यू प्रमाण दर हजार मातांमागे ६८ आहे.

☞ राज्यातील सीमांतिक कामगार (अर्धवेळ) ५७ लाख.

☞ जनगणना २०११ नुसार राज्यातील ३० लाख लोक बेरोजगार आहेत वा कामाच्या शोधात आहेत.

☞ स्त्री-पुरुष प्रमाण मुंबई-८३२, मुंबई उपनगर ८६० तर ठाणे ८८६ आहे. इतर जिल्ह्यांच्या तुलनेत हे प्रमाण कमी असून एकूण महाराष्ट्रातील स्त्री-पुरुष प्रमाण ९२९ आहे.

☞ महाराष्ट्रात मुंबई, कोकण, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर येथे १४२ औद्योगिक वसाहती मंजूर होते. त्यापैकी १०२ औद्योगिक वसाहती कार्यरत असून त्यापैकी ४० बंद आहेत. त्यापैकी २६ मराठवाडा व विदर्भात आहेत.

☞ मूलभूत शिक्षणाबाबत ५ हजार ३०७ वर्गखोल्या बांधून झाल्या आहेत. परंतु वर्ष २०१४-१५ मध्ये एकाही संगणक कक्षांची स्थापना करण्यात आलेली नाही.

☞ आज राज्यातील ५९ हजार ६३९ शाळांमध्ये संगणकांची सोय नाही.

☞ १० हजार ५७० शाळांमध्ये अपंग विद्यार्थ्यांसाठी उतरंड (Ramp) नाहीत.

☞ ८ हजार ९१ शाळांमध्ये विजेची जोडणी झालेली नाही.

☞ २२ हजार ५७६ शाळांमध्ये 'कुंपण भिंत / संरक्षक भिंत' नाहीत.

☞ ५२२ शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय नाही.

☞ वर्ष २०१५ मध्ये प्रथम संस्थेतर्फे राज्यातील ३३ जिल्ह्यातील ९८४ गावांमध्ये मुलांची शैक्षणिक स्थिती तपासण्यात आली तेव्हा असे आढळून आले की, ३६ हजार ८३३ मुलांपैकी इयत्ता पहिली स्तराची वाचन क्षमता असलेल्या तिसऱ्या इयत्तेतील मुलांची टक्केवारी ६३.३% होती.

☞ वर्ष २०१४ मध्ये ८ हजार ११५ अत्याचाराचे गुन्हे घडले होते. त्यात डिसेंबर मध्ये ३ हजार ५६१ गुन्हे वाढले आहेत व ही संख्या ११ हजार ६७६ वर पोहोचली आहे म्हणजे ३ हजार ५६१ एवढे गुन्हे २०१५ मध्ये वाढ.

☞ वर्ष २०१५-१६ मध्ये १३१ रोजगार मेळावे भरवण्यात आले होते. तेव्हा तेथे ७३३ उद्योजक उपस्थित होते व ५४ हजार ९७५ बेरोजगार रोजगार मिळविण्यासाठी आले होते. त्यापैकी १५ हजार २४८ युवक-युवतींना रोजगार मिळाला (२७.७३%) ३९ हजार २२७ विद्यार्थ्यांना रोजगार मिळाला नाही.

☞ अनुसूचित जाती उपयोजनेसाठी वर्ष २०१४-१५ मध्ये ६ हजार ४४ कोटी २६ लाखांचा नियतव्यय देण्यात आला होता. त्यापैकी केवळ ३ हजार ५८३ कोटी २९ लाख म्हणजे ५९.३% खर्च झाले होते. २ हजार ४६० कोटी ९७ लाख रुपये खर्च झाले नाहीत. त्याच प्रमाणे वर्ष २०१५-१६ मध्ये ६ हजार ४९०कोटी नियतव्यय देण्यात आला होता त्यापैकी डिसेंबर २०१५ पर्यंत केवळ २ हजार १७ कोटी ३२ लाख निधी खर्च झाला आहे. हा खर्च केवळ ३१% आहे.

☞ वर्ष २०१४-१५ मध्ये आदिवासी उपयोजनेसाठी ४ हजार ८१४ कोटी ९२ लाखांचा नियतव्यय देण्यात आला होता. त्यापैकी ४ हजार ३२ कोटी ६८ लाखांचा निधी खर्च करण्यात आला आहे. (८३.७%) मात्र २०१५-१६ मध्ये रु. ५ हजार १७० कोटी नियतव्यय देण्यात आला होता. त्यापैकी १ हजार ७१८ कोटी १२ लाख रुपयांचा निधी (३३.२३%) निधी खर्च झाला आहे.

☞ अ) आरोग्यदायी दीर्घायुष्य, ज्ञान आणि दर्जेदार राहणीमान या तीन परिमाणाचा मानव विकासात विचार केला जातो. ब) भारत मानव विकास अहवाल २०११ नुसार केरळ ०.७९० देशात प्रथम क्रमांकावर आहे. त्यापाठोपाठ दिल्ली ०.७५०, हिमाचल प्रदेश ०.६५२, गोवा ०.६१७, पंजाब ०.६०५, त्यानंतर महाराष्ट्र ०.५७२ सह सहाव्या क्रमांकावर आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातही मानव विकास निर्देशांकाची उच्च विकसित, विकसित, गरीब अशी जिल्हानिहाय विभागणी झाली.

☞ महाराष्ट्र मानव विकास अहवाल. २०१२ नुसार ३४ जिल्ह्यांपैकी ९ अति उच्च विकसित ०.७४२ आणि त्यापेक्षा जास्त १) मुंबई -०.८४१, पुणे ०.८१४, ठाणे ०.८००, ८ उच्च विकसित ०.७२० ते ०.७४२, २) सातारा - ०.७४२, रत्नागिरी ०.७३२, सोलापूर -०.७२८, ८ मध्यम विकसित ०.६७८ ते ०.७१८ ३) चंद्रपूर, ०.७१८, अमरावती ०.७०१, ९ जिल्हे अल्प विकसित, ०.६७१ व त्यापेक्षा कमी आहेत. ४) नंदूरबार - ०.६०४, गडचिरोली - ०.६०८, वाशिम ०.६४६ हे सर्वात शेवटी आहेत.

☞ राज्यातील साक्षरतेचे प्रमाण ८२.३ टक्के असून अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीसाठी ते अनुक्रमे ७९.७ टक्के व ६५.७ टक्के आहे.

### गुन्ह्यांचे विश्लेषण:

☞ सन २०१४ मध्ये अनुसूचित जातीच्या व्यक्तीवरील अत्याचारांच्या दाखल गुन्ह्यांमध्ये सोलापूर ग्रामीण घटकात सर्वात जास्त गुन्हे (११०) दाखल झाले असून त्याचा राज्याच्या एकूण (१७६८) दाखल गुन्ह्यांपैकी ६.२२ टक्के इतका वाटा आहे.

☞ पोलीस आयुक्तालयांचा विचार करता सन २०१४ मध्ये अनुसूचित जातीवरील अत्याचाराचे सर्वात जास्त गुन्हे पुणे शहरात (५५) दाखल झाले असून ते राज्यातील एकूण (१७६८) दाखल गुन्ह्याच्या ३.११टक्के इतके आहेत.

### खून: ४३ गुन्हे

☞ सन २०१४ मध्ये खूनाचे ४३ गुन्हे दाखल झाले. सन २०१३ मध्ये ४० गुन्हे दाखल होते. २०१३ शी तुलना करता २०१४ मध्ये खुनाच्या गुन्ह्यांत ३ ने वाढ (७.५ टक्के) वाढ झाली. तसेच २००९(२७) च्या तुलनेत सन २०१४ मध्ये ५९.२६ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

### बलात्कार: १७९ गुन्हे

☞ सन २०१३ (१७९ गुन्हे) व सन २०१४ (१७९ गुन्हे) मध्ये या शीर्षाखाली समान गुन्हे दाखल आहेत. सन २००९ (१०५ गुन्हे) च्या तुलनेत सन २०१४ मध्ये ७०.४८टक्क्यांनी वाढ झाल्याचे दिसते.

### अपहरण व पळवून नेणे : ३७ गुन्हे

☞ सन २०१४ मध्ये ३७ गुन्हे तर २०१३ मध्ये ३३ गुन्हे दाखल होते. या शीर्षाखाली ०४ गुन्ह्यांची (१२.१२ टक्क्यांनी) वाढ झाली आहे. सन २००९ (१० गुन्हे) च्या तुलनेत सन २०१४ मध्ये २७ ने वाढ झाल्याचे दिसून येते.

### दरोडा : २० गुन्हे

☞ सन २०१३ (२६ गुन्हे) च्या तुलनेत सन २०१४ (२० गुन्हे) मध्ये या शीर्षाखाली ६ गुन्ह्यांची (२३.०८टक्के) घट झाली आहे.

### जबरी चोरी : १८ गुन्हे

☞ सन २०१३ (२२ गुन्हे) च्या तुलनेत सन २०१४ (१८ गुन्हे) मध्ये या शीर्षाखाली ४ गुन्ह्यांची (१८.१८ टक्के) घट झाली आहे. सन २००९ (८ गुन्हे)च्या तुलनेत सन २०१४ मध्ये (१०गुन्हे) ने वाढ झाल्याचे दिसते.

**जाळपोळ: ११ गुन्हे**

☞ सन २०१३ (१० गुन्हे) च्या तुलनेत सन २०१४ (११ गुन्हे) मध्ये या सदराखाली १ गुन्ह्याची (१० टक्के) वाढ झाली आहे. मात्र सन २००९ (८ गुन्हे) च्या तुलनेत सन २०१४ मध्ये (११गुन्हे) ३७.५० टक्क्यांनी वाढ झाल्याचे दिसून येते.

**दुखापत : २६ गुन्हे**

☞ सन २०१३ (१६७ गुन्हे) च्या तुलनेत सन २०१४ (२६ गुन्हे) मध्ये या सदराखाली गुन्ह्यांमध्ये ८४.४३ टक्के) घट झाली आहे. मात्र सन २००९ (५६ गुन्हे) च्या तुलनेत सन २०१४ मध्ये ५३.५७ टक्क्यांनी घट झाली आहे.

**नागरी हक्क संरक्षण कायदा: ५ गुन्हे**

☞ सन २०१३ (२१गुन्हे) च्या तुलनेत सन २०१४ मध्ये (०५) गुन्हे दाखल झाले आहेत. या सदराखाली १६ गुन्ह्यांची (७६.१९ टक्के) घट झालेली आहे. मात्र सन २००९ (२४ गुन्हे) च्या तुलनेत सन २०१४ मध्ये ७९.१७ टक्क्यांनी घट झाली आहे.

**अनुसूचित जाती/जमाती अत्याचार (प्रतिबंधक) कायदा: ३२९ गुन्हे**

☞ सन २०१३ (२७७ गुन्हे) च्या तुलनेत सन २०१४ (३२९ गुन्हे) मध्ये १८.७७ टक्क्यांनी वाढ झाली आहे. मात्र सन २००९ (२९१ गुन्हे) च्या तुलनेत सन २०१४ मध्ये १३.०६ टक्क्यांनी वाढ झाल्याचे दिसून येते.

**इतर गुन्हे: ४७५ गुन्हे**

☞ सन २०१३ (९०३ गुन्हे) च्या तुलनेत सन २०१४ (४७५ गुन्हे) मध्ये ४७.४० टक्क्यांनी वाढ झाली आहे. तरा सन २००९ (५४७ गुन्हे) च्या तुलनेत सन २०१४ मध्ये १३.१६ टक्क्यांनी घट झाल्याचे दिसून येते.

**अनुसूचित जातीच्या सदस्यांवरील अत्याचाराचे गुन्हे: ४४३ गुन्हे**

☞ सन २०१४ मध्ये अनुसूचित जमातीवरील अत्याचारांचे एकूण ४४३ गुन्हे दाखल झाले आहेत. सन २०१३ मध्ये ४१५ गुन्हे दाखल होते. सन २०१४ मध्ये २०१३च्या तुलनेत ६.७५टक्क्यांनी वाढ झाली आहे.तसेच सन २००९ (२२४ गुन्हे) च्या तुलनेत सन २०१४ मध्ये ९७.७७ टक्क्यांनी वाढ झालेली आहे.

## अनुसूचित जातीच्या जनतेला शासन न्याय देण्यात ठरतेय अपयशी !

राज्य शासन उपेक्षित जनतेच्या न्याय, हक्कासाठी प्रतिज्ञाबद्ध आहे असे म्हणत असले तरी कृती शून्य असल्याचे दिसून येते. वर्ष २०१५-१६ या वर्षाच्या कालावधीत राज्य शासनाने अनुसूचित जातीसाठी ६ हजार ४९० कोटीं रुपयांचा नियतव्यय राखून ठेवण्यात आला होता. त्यापैकी एप्रिल ते डिसेंबर २०१५ च्या अखेर पर्यंत म्हणजे ९ महिन्यांच्या कालावधीत २ हजार १७ कोटी ३२ लाख रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे तर ४ हजार ४७२ कोटी ६८ लाख रुपयांचा नियतव्यय खर्च झालेला नाही. खर्च न झालेला हा निधी ६८.९२ टक्के इतका प्रचंड आहे. यावरून हे शासन अनुसूचित जाती जमातीला न्याय देण्यात अपयशी ठरल्याचे दिसून येते.


*-महाराष्ट्राची आर्थिक पाहणी-२०१५-१६*

# सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

समाजाकडून सर्व घटकांना विशेषत: अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग, अल्पसंख्यांक, निशक्त व जेष्ठ नागरीक इत्यादींना न्याय वागणूक आणि सामाजिक लाभांमध्ये समान वाटा प्रदान करणे म्हणजे सामाजिक न्याय होय. भारतीय संविधानात धोरणांची निदेशक तत्त्वे समाविष्ट करण्यात आली असून त्याअनुषंगाने दुर्बल घटकांना समाजातील इतर घटकांच्या समान पातळीवर आणन्यासाठी विविध विकास कार्यक्रम हाती घेतले आहेत. राज्य शासन अनुसूचित जाती करिता अनुसूचित जाती उपाय योजना तयार करते सर्वसाधारण योजनांतर्गत उपलब्ध करून दिला जाणारा निधी व लाभाव्यतिरिक्त अनुसूचित जाती उपयोजनेद्वारे संबंधित समुदायास त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला जातो.

## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा अर्थसंकल्प

*आलेख क्र. १* *(रु. कोटीत)*




| | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय अंदाज | २८५८ | २६०१ | ५१२५ | ६६३७ | ७०९६ | ८४३० | ९९७२ | ११०७४ | १२२०२ |
| सुधारित अंदाज | ४०४५ | ४९२१ | ५८२८ | ६७२१ | ६८५८ | ८३९२ | ९१३२ | १०४९२ | |
| प्रत्यक्ष खर्च | ३७६२ | ४६३२ | ५३७४ | ५९९८ | ६६१२ | ८२२० | ८२९८ | | |

*(स्त्रोत: अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका व वित्तविषयक विवरणपत्र)*

*टीप : अर्थसंकल्पीय अंदाज वर्ष २०१६-१७ व सुधारित अंदाज वर्ष २०१५-१६*

- वर्ष २००८-०९ ते २०१४-१५ या ७ वर्षाच्या काळात सरासरी प्रत्यक्ष उपलब्ध निधी रु. २ हजार ८४० कोटी ५० लाख इतका होता.
- वर्ष २००९-१० व वर्ष २०१०-११ या दोन वर्षाच्या काळात अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा उपलब्ध झालेला निधी अनुक्रमे रु. ११८७ कोटी (४५.६३ टक्के) व रु.२३२० (८९.१९ टक्के) कोटी ने अधिक होता.
- वर्ष २००८-०९ ते २०१४-१५ या ७ वर्षांच्या काळात कधीही सुधारित अंदाजांइतका निधी उपलब्ध झालेला नाही.
- वर्ष २०१४-१५ मध्ये सुधारित अंदाज रु. ९ हजार १३२ कोटी असताना उपलब्ध झालेला निधी हा रु. ८ हजार २९८ कोटी इतका होता म्हणजेच सुधारित अंदाजाच्या प्रमाणात तो ९०.८७ टक्के होता.
- वर्ष २००८-०९ आणि वर्ष २००९-१० या २ वर्षांमध्ये अर्थसंकल्पीय अंदाजांपेक्षा सुधारित अंदाज हे अनुक्रमे ७० टक्के व ५२.८६ टक्के इतक्या प्रमाणात वाढलेले होते. याचाच अर्थ विभागाचे अर्थसंकल्प तयार करताना कोणत्याच प्रकारचे नियोजन नव्हते.
- वर्ष २०१३-१४ मध्ये रु. ८ हजार २२० कोटी रुपये निधी खर्च झाला असून २०१२-१३ च्या तुलनेत तो रु. १ हजार ६०८ कोटींनी ( १९.५६ टक्के) अधिक आहे.
- वर्ष २०१४-१५ मध्ये रु. ९ हजार ९७२ कोटी अर्थसंकलीत करण्यात आले होते. सुधारित अंदाजात रु. ८४२कोटींची (८.४२ टक्के) घट झाली तर प्रत्यक्ष खर्चात रु. १ हजार ६७४ कोटींची (१६.७९ टक्के) घट झाली आहे.

# वर्ष २०१५-१६ साठी राज्यातील अनुसूचित जाती उपयोजनेसाठी राखून ठेवलेला रू. ४ हजार ४७२ कोटी ६८ लाखाचा निधी १ जानेवारी २०१६ पर्यंत अखर्चित

तक्ता क्र. १ 　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　रु. कोटीत

| क्षेत्र | २०१४-१५ | | | २०१५-१६ | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | नियतव्यय | खर्च | खर्चाची नियतव्ययाशी टक्केवारी | नियतव्यय | खर्च | खर्चाची नियतव्ययाशी टक्केवारी |
| **अ) राज्यस्तरीय योजना** | **४,०४४.२६** | **१७२०.४७** | **४२.५** | **४,०९०.००** | **७४४.५८** | **१८.२०** |
| कृषि व सलग्न कार्य | ६४.२८ | २७.१३ | ४२.२ | ६१.३० | १०.७८ | १७.५९ |
| ग्राम विकास | १३.६८ | ०.०० | ०.०० | ३०.०० | १०.५८ | ३५.२७ |
| उद्योग खनिजे | २१.२६ | १०.०७ | ४७.४ | ३०.०३ | ०.०० | ०.०० |
| सामान्य आर्थिक सेवा | ६०.०० | ३३.५३ | ५५.९ | ०.०० | ०.०० | ०.०० |
| सामाजिक व सामुहिक सेवा | ३८७५.०४ | १६४८.०१ | ४२.५ | ३९४५.३६ | ७०७.५७ | १७.९३ |
| सामान्य सेवा | १०.०० | १.७३ | १७.३ | ३३.३१ | १५.६५ | ४६.९८ |
| **ब) जिल्हा स्तरीय योजना** | **२,०००.००** | **१८६२.८२** | **९३.१** | **२,४००.००** | **१,२७२.७४** | **५३.०३** |
| कृषि व सलग्न कार्य | २७०.६९ | २६९.१९ | ९९.४ | २९४.०० | १६२.६६ | ५५.३३ |
| ग्राम विकास | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| उर्जा | ७४.९७ | ०.०० | ०.०० | ७६.६९ | १०.९९ | १४.३३ |
| उद्योग खनिजे | ११.५६ | ११.०० | ९५.२ | ११.८९ | २.७३ | २२.९६ |
| वाहतूक | ३२.२५ | २५.९९ | ८०.६ | ५५.६० | २०.२३ | ३६.३८ |
| सामाजिक व सामुहिक सेवा | १,६१०.५२ | १,५५६.६४ | ९६.७ | १,९६१.७३ | १,०७६.१३ | ५४.८६ |
| **एकूण (अ+ब)** | **६,०४४.२६** | **३,५८३.२९** | **५९.३** | **६,४९०.००** | **२,०१७.३२** | **३१.०८** |

*स्त्रोत: महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०१५-१६*

☞ **अनुसूचित जाती उपयोजनेसाठी रु. ६ हजार ४९० कोटी नियतव्यय उपलब्ध करून दिला असून त्यापैकी राज्यस्तरीय योजनेकरिता रु. ४ हजार ९० कोटी (६३%) तर जिल्हा योजनेसाठी रु. २ हजार ४०० (३७%) निधी राखून ठेवण्यात आला आहे.**

☞ **डिसेंबर २०१५ च्या शेवट पर्यंत रु. २ हजार१७ कोटी ३२ लाख खर्च करण्यात आले असून अखर्चित निधी रु. ४ हजार ४७२ कोटी ६८ लाख (६८.९२%) इतका मोठा आहे**

☞ **वर्ष २०१५-१६ मध्ये उद्योग खनिजे यासाठी ३० कोटी ३ लाख रुपये राखून ठेवण्यात आले होते. मात्र त्यापैकी एकही रुपया खर्च करण्यात आलेला नाही.**

☞ **वर्ष २०१४-१५ मध्ये रु. ६ हजार ४४ कोटी २६ लाखांचा नियतव्यय ठेवण्यात आला होता त्यापैकी रु. ३ हजार ५८३ कोटी २९ लाख (५९.२८%) निधी खर्च करण्यात आले होते.**

☞ **वर्ष २०१५-१६ मध्ये सामान्य आर्थिक सेवा यासाठी राज्य योजनेत एक रुपयाचीही तरतूद करण्यात आलेली नाही.**

# अनुसूचित जातीवरील अत्याचाराचे गुन्हे १ हजार ७६८
## अनुसूचित जाती व जमातींच्या नागरिकांवरील अत्याचाराचे प्रमाण वाढले

तक्ता क्र. २

| गुन्ह्याचा प्रकार | वर्ष | | | | | | २००९ शी २०१४ ची % | २०१३शी २०१४ची % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २००९ | २०१० | २०११ | २०१२ | २०१३ | २०१४ | | |
| खून | २७ | २४ | २६ | ३६ | ४० | ४३ | ५९.२६ | ७.५० |
| बलात्कार | १०५ | ८९ | ९५ | ९७ | १७९ | १७९ | ७०.४८ | ०.०० |
| अपहरण व पळवून नेणे | १० | २५ | १२ | २३ | ३३ | ३७ | २७०.०० | १२.१२ |
| दरोडा | २० | २२ | १६ | १६ | २६ | २० | ०.०० | -२३.०८ |
| जबरी चोरी | ८ | २० | १२ | १३ | २२ | १८ | १२५.०० | -१८.१८ |
| जाळपोळ | ८ | १२ | ७ | ९ | १० | ११ | ३७.५० | १०.०० |
| दुखापत | ५६ | ७७ | ८४ | ८१ | १६७ | २६ | -५३.५७ | -८४.४३ |
| नागरी हक्क संरक्षण कायदा | २४ | २५ | १० | ५ | २१ | ५ | -७९.१७ | -७६.१९ |
| अनु. जाती/ जमाती प्रतिबंधक कायदा | २९१ | ३१९ | ३०४ | २६७ | २७७ | ३२९ | १३.०६ | १८.७७ |
| इतर गुन्हे | ५४७ | ५१९ | ५७७ | ५४४ | ९०३ | ४७५ | -१३.१६ | -४७.४० |
| **एकूण** | **१०९६** | **११३२** | **११४३** | **१०९१** | **१६७८** | **१७६८** | **६१.३१** | **५.३६** |

*(स्त्रोत: महाराष्ट्रातील गुन्हे - २०१४)*

- **वर्ष २००९शी तुलना करता वर्ष २०१४ मध्ये अनुसूचित जातीवरील अत्याचारांतर्गत नोंदविलेल्या गुन्ह्यांमध्ये प्रामुख्याने अपहरण व पळवून नेण्याच्या प्रमाणात २७० टक्के, जबरी चोरी प्रमाणात १२५ टक्के तर बलात्कारात ७०.४८ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. तर खुनाच्या गुन्ह्यात ५९.२६टक्के वाढ झाली आहे.**

- **वर्ष २०१३ शी तुलना करता वर्ष २०१४ मध्ये अनुसूचित जातीवरील अत्याचारांतर्गत नोंदविलेल्या गुन्ह्यांमध्ये अपहरण व पळवून नेणे या गुन्ह्यात १२.१२ टक्के इतकी वाढ झालेली आहे. तर खुनासारख्या गुन्ह्यात ७.५ टक्के इतकी वाढ झाली आहे.**

- **अनुसूचित जातीवरील अत्याचारांतर्गत नोंदविलेल्या गुन्ह्यांच्या प्रकारामध्ये अनुसूचित जाती/जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार ठरणाऱ्या गुन्ह्यांची संख्या पहाता वर्ष २००९ शी तुलना करता वर्ष २०१४ मधील या कायद्याखाली दाखल झालेल्या गुन्ह्यांचे प्रमाण १३.०६ टक्क्यांनी घटले आहे.**

- **वर्ष २०१४ मध्ये घडलेल्या अनुसूचित जातीवर झालेल्या अत्याचारात अनुसूचित जाती/जमाती प्रतिबंधक कायद्यांतर्गत ३२९ गुन्ह्यांची नोंद झाली असून बलात्काराच्या १७९ गुन्ह्यांची नोंद झाली आहे.**

# अनुसूचित जमातींवरील अत्याचारांचे वर्ष २०१४ मध्ये ४४३गुन्हे

## मागील वर्षाच्या तुलनेत गुन्ह्यांत वाढ

तक्ता क्र. ३

| गुन्ह्याचा प्रकार | वर्ष | | | | | | २००९ शी २०१४ ची % | २०१३ शी २०१४ ची % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २००९ | २०१० | २०११ | २०१२ | २०१३ | २०१४ | | |
| खून | ८ | ९ | १६ | ११ | ७ | २० | १५०.०० | १८५.७१ |
| बलात्कार | ५० | ४६ | ५७ | ५६ | ९१ | ८६ | ७२.०० | -५.४९ |
| अपहरण व पळवून नेणे | १ | ८ | ११ | ७ | ९ | ८ | ७००.०० | -११.११ |
| दरोडा | १ | १ | ३ | ४ | ६ | ० | -१००.०० | -१००.०० |
| जबरी चोरी | १ | १ | २ | ३ | २ | ५ | ४००.०० | १५०.०० |
| जाळपोळ | ६ | ७ | ४ | १ | ५ | ४ | -३३.३३ | -२०.०० |
| दुखापत | ६ | ११ | १८ | १७ | २९ | १० | ६६.६७ | -६५.५२ |
| नागरी हक्क संरक्षण कायदा | ० | ० | ० | १ | ८ | ० | ० | -१००.०० |
| अनु.जाती/जमाती प्रतिबंधक कायदा | ३७ | ५५ | ६१ | ५३ | ४५ | ५५ | ४८.६५ | २२.२२ |
| इतर गुन्हे | ११४ | १५४ | १४९ | १५५ | २१३ | ८६ | -२४.५६ | -५९.६२ |
| **एकूण** | **२२४** | **२९२** | **३२१** | **३०८** | **४१५** | **४४३** | **९७.७७** | **६.७५** |

*(स्त्रोत: महाराष्ट्रातील गुन्हे -२०१४)*

☞ **वर्ष २०१३शी तुलना करता वर्ष २०१४ मध्ये अनुसूचित जमातींवरील नोंदविलेल्या विविध गुन्ह्यांपैकी खून या गुन्ह्यामध्ये १८५ टक्के वाढ झाली आहे.**

☞ **वर्ष २००९ ची वर्ष २०१४ शी तुलना करता अनुसूचित जमातींवरील नोंदविलेल्या गुन्ह्यांमध्ये जबरी चोरीचे प्रमाण ४०० टक्क्यांने वाढले आहे.**

☞ **वर्ष २०१३ मध्ये अनुसूचित जमाती प्रतिबंधक कायद्यानुसार ४५ गुन्हे नोंदविले गेले होते. वर्ष २०१४ मध्ये त्यात १० ने वाढ होऊन हे गुन्हे ५५ इतके झाले आहे.**

☞ **वर्ष २०१४ मध्ये अनुसूचित जमातीवरील बलात्काराची ८६ प्रकरणे घडली.**

# १ हजार ५७१ प्रकरणे प्रलंबित,

# अनुसूचित जाती जमातीतील जनता न्यायाच्या प्रतिक्षेत

तक्ता क्र. ४

| वर्ष | प्राप्त प्रकरणे | निकाली काढलेली प्रकरणे | प्रलंबित प्रकरणे | प्राप्त प्रकरणांची प्रलंबित प्रकरणांशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| २०१२ | ९४५ | ४७२ | २०३ | २१.४८ |
| २०१३ | ९८५ | ६११ | ३७४ | ३७.९७ |
| २०१४ | ७७९ | २०८ | ५७१ | ७३.३० |
| २०१५ | ७६३ | ३४० | ४२३ | ५५.४४ |
| ३१ जाने.२०१६ | ८९ | - | - | ०.०० |
| **एकूण** | **३५६१** | **१६३१** | **१५७१** | **४४.१२** |

*स्त्रोत:महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाकडून प्राप्त माहिती दिनांक १८ मार्च, २०१६*

☞ **वर्ष २०१२ ते ३१ जानेवारी, २०१६ पर्यंत महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाकडे अनुसूचित जाती जमातीच्या लोकांनी न्याय मागण्यासाठी ३ हजार ५६१ प्रकरणे दाखल करण्यात आली होती.**

☞ **दाखल करण्यात आलेल्या ३ हजार ५६१ प्रकरणांपैकी १ हजार ६३१ (४४.१२%) प्रकरणे न्यायाच्या प्रतिक्षेत.**

☞ **वर्ष २०१६ मध्ये ८९ प्रकरणे दाखल झाली असून त्यापैकी एकही प्रकरण निकाली काढण्यात आलेले नाही.**

## अनुसूचित जाती जमातीच्या जनतेला आयोगातही न्याय नाही

**वर्ष २०१२-१३ ते २०१५-१६ या कालावधीत अनुसूचित जाती-जमाती आयोगाकडे अनुसूचित जाती जमातीतील जनतेने न्याय मिळेल या अपेक्षेने ३ हजार ५६१ प्रकरणे दाखल केली. मात्र त्यापैकी केवळ १ हजार ६३१ प्रकरणे निकाली काढण्यात आली. तर १ हजार ५०१ प्रकरणांमध्ये न्याय मिळू न शकल्याने प्रलंबित राहिली. एवढ्या कालावधीत जर न्याय मिळणार नसेल तर या जनतेने न्यायासाठी आणखी कोणाकडे जायचे हा मुख्य प्रश्न आहे.**

*-महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाकडून प्राप्त माहिती १८ मार्च, २०१६*